महाराष्ट्र शासन
वित्तीय सल्लागार व उप सचिव,
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
जी.टी.हॉस्पिटल कॉम्प्लेक्स इमारत, ८ वा मजला,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई - ४०० ००१

दूरध्वनी क्र- ०२२ २२६१६८२३/६९४१ Email ID : fadsmumbai.mhpds@gov.in

क्र. विसउस/का.३ (आ)/निविदा/बाम/२५-२६/२४५२ दिनांक : १२/०२/२०२६.

विषय :- बाह्ययंत्रणेमार्फत मनुष्यबळ पुरविणाऱ्या संस्थाकडून वाहनचालक व शिपाई कामासाठी मनुष्यबळ उपलब्ध करून घेण्यासाठी निवीदा मागविणेबाबत.

वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई येथे १ वाहनचालक व ७ शिपाई असे एकूण ८ कर्मचा-यांची सेवा नोंदणीकृत बाह्ययंत्रणा संस्थांकडून दिनांक ०१/०४/२०२६ पासून ११ (अकरा) महिन्यांच्या कालावधीसाठी उपलब्ध करुन घेण्यासाठी स्थानिक कंत्राटदाराकडून निवीदा मागविण्यात येत आहेत.

निवीदा सादर करणेसाठीचा सविस्तर तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| अ | पक्षकार :- |
| | करारनाम्याचे पक्षकार हे कंत्राटदार (ज्यांना काम सोपविले आहे) आणि वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई हे राहतील. |

| | |
|---|---|
| ब | शिपाई उमेदवारासाठी अटी व शर्ती |
| १ | नेमणूक करण्यात येणाऱ्या उमेदवाराचे वय ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे व मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत वय ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे. |
| २ | नेमणूक करण्यात येणारा उमेदवार हा किमान माध्यमिक शालांत परीक्षेत (१० वी) १०० गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय (उच्चस्तर किंवा निम्नस्तर) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. |
| ३ | उमेदवारास मराठी भाषा वाचता व बोलता येणे आवश्यक आहे. |
| ४ | उमेदवार निर्व्यसनी असावा, गुन्हेगारी पार्श्वभूमीचा नसावा. |
| ५ | उमेदवाराची वैयक्तिक माहिती पुरविणे आवश्यक राहील. उदा. शैक्षणिक अर्हता, कायम व सध्याचा पत्ता, नमुना स्वाक्षरी, पॅन कार्ड व आधार कार्ड कॉपी, चारित्र्यविषयक प्रमाणपत्र, अलीकडे काढलेला पासपोर्ट साईज फोटोग्राफ, बँक खात्याचा तपशील, राज्य कामगार विमा योजना ओळखपत्र व कर्मचारी भविष्य निर्वाह निधी क्रमांक तसेच वरिष्ठांच्या परवानगी शिवाय कार्यालयीन दस्तऐवज प्रत्यक्षरित्या अथवा इलेक्ट्रॉनिक स्वरुपात कार्यालयाचे बाहेर नेणार नाही याबाबतचे हमीपत्र सादर करणे आवश्यक राहील. |

| | |
|---|---|
| ब (१) | वाहनचालक उमेदवारासाठी अटी व शर्ती |
| १ | नेमणूक करण्यात येणाऱ्या उमेदवाराचे वय ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे व मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत वय ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे. |

Scanned with OKEN Scanner

| | |
|---|---|
| २ | नेमणूक करण्यात येणारा उमेदवार हा माध्यमिक शालांत परीक्षेत (१० वी) १०० गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय (उच्चस्तर किंवा निम्नस्तर) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. |
| ३ | उमेदवाराजवळ प्रादेशिक परिवहन कार्यालय (RTO) हलके/जड वाहन चालविण्याचा परवाना संकेतस्थळावर ज्या दिनांकास सदर जाहिरात प्रसिध्द करण्यात येईल, त्या दिनांकापासून किमान २ वर्षापूर्वीचा वैध परवाना असणे आवश्यक आहे. |
| ४ | उमेदवारांस शासकीय/निमशासकीय कार्यालयामध्ये नियमित किंवा अनियमित (तदर्थ वा कंत्राटी) वाहनचालक पदावर हलके/जड वाहन चालविण्याचा किमान दोन वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. |
| ५ | उमेदवारास मराठी भाषा वाचता व बोलता आणि इंग्रजी भाषा वाचता येणे आवश्यक आहे. |
| ६ | उमेदवार निर्व्यसनी असावा, गुन्हेगारी पार्श्वभूमीचा नसावा. |
| ७ | उमेदवाराची वैयक्तिक माहिती पुरविणे आवश्यक राहील. उदा. शैक्षणिक अर्हता, कायम व सध्याचा पत्ता, नमुना स्वाक्षरी, पॅन कार्ड व आधार कार्ड कॉपी, चारित्र्यविषयक प्रमाणपत्र, अलीकडे काढलेला पासपोर्ट साईज फोटोग्राफ, बँक खात्याचा तपशील, राज्य कामगार विमा योजना ओळखपत्र व कर्मचारी भविष्य निर्वाह निधी क्रमांक तसेच वरिष्ठांच्या परवानगी शिवाय कार्यालयीन दस्तऐवज प्रत्यक्षरित्या अथवा इलेक्ट्रॉनिक स्वरुपात कार्यालयाचे बाहेर नेणार नाही याबाबतचे हमीपत्र सादर करणे आवश्यक राहील. |

| क. | वाहनचालक व शिपाईची सेवा देणाऱ्या संस्थेसाठी अटी व शर्ती |
|---|---|
| १ | कंत्राटदार वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई कार्यालयाकरिता १ वाहनचालक व ७ शिपाई पुरवतील. |
| २ | कंत्राटदारास शिपाई कर्मचाऱ्यास किमान वेतन अधिनियम १९४८ कायदयानुसार दुकाने व व्यापारी आस्थापना उद्योग ह्या प्रकारातील अकुशल कामगाराकरिता वेतन देणे बंधनकारक राहील. |
| ३ | उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या सुधारीत अधिसूचना दि. २४/०७/२०१९ नुसार कंत्राटी किमान वेतनाचे दर सुधारीत करण्यांत आलेले आहेत. तसेच विविध कामगार कायद्यान्वये वेळोवेळी निश्चित केलेल्या दरानुसार विशेष/महागाई भत्ता, घरमाडे भत्ता, इतर भत्ते व वजावटी उदा. भविष्य निर्वाह निधी/ राज्य कामगार विमा योजना व्यावसायिक कर / बोनस / कामगार कल्याण निधी या दायित्वांचा समावेश करून एकूण किमान व वेतन व भत्ते परिगणित करण्यांत आलेले आहे. त्यानुसार कंत्राटी कर्मचा-यांना किमान वेतन व अनुषंगिक माहे प्रदान करने तसेच नियमातील तरतूदीनुसार त्याबाबतची दायित्वे संबंधित प्राधिकरणाकडे भरणे बंधनकारक राहील. |
| ४ | वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक जीएसटी १०१०/प्र.क्र.८१/कराधान-१ दि.१९.०८.२०१७ नुसार जीएसटी अधिनियमानुसार कराची आकारणी बंधनकारक आहे. |

| ड | निविदेसंबंधीच्या अटी व शर्ती |
|---|---|
| | अ. तांत्रिक लिफाफा |
| १ | सबंधित संस्था/अर्जदार ही खालील पैकी एका कायद्यांतर्गत नोंदणीकृत असावी. (नोंदणी प्रमाणपत्राची प्रत सोबत जोडावी)<br>मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम १९४८,<br>भागीदारी संस्था अधिनियम १९३२,<br>सहकारी संस्था अधिनियम १९६१,<br>कंपनी अधिनियम १९५६ |
| २ | उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखंस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४ |

Scanned with OKEN Scanner

| | |
|---|---|
| | दि.०१/१२/२०१६ मधील प्रकरण क्रमांक ३/अ.क्र.३.१ व प्रकरण क्र.६.८ परिशिष्ट ८ मधील तरतुदीनुसार निविदा अर्जासोबत निविदा शुल्क रु.३,०००/- व बयाना रक्कम रु.५०,०००/- धनाकर्ष (राष्ट्रीयकृत बँकेचा) लेखा अधिकारी, वित्तीय सल्लागार व उपसचिव, मुंबई यांचे नावाने देण्यात यावा. रोजगार व स्वयंरोजगार विभाग, शासन निर्णय क्रमांक रोस्वरो २००२/प्रक २३७/रोस्वरो-१ दिनांक १७/०८/२००२ मधील अ. क्र. ८ अन्वये शासकीय किंवा निमशासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यालयांमध्ये सेवेचा पुरवठाकरिता निविदा/दरपत्रक भरताना निविदा शुल्क बयाणा रक्कम। भरण्याच्या अटीतून पंजीकृत बेरोजगारांच्या सहकारी सेवा संस्थांना / लोकसेवा केंद्राना सूट देण्यात आली आहे. तसेच उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दि.०१/१२/२०१६ मधील प्रकरण क्र.६ परिशिष्ट ८ नुसार शासकीय मंडळ / महामंडळ / उपक्रमांना तसेच सुक्ष्म व लघु, मध्यम उपक्रमांतर्गत नोंदणीकृत असलेले उत्पादक व पुरवठादार यांना निविदेमध्ये निविदा शुल्क व बयाणा रक्कम भरण्यापासून सूट देण्यात आली आहे. त्याअनुषंगाने आवश्यक प्रमाणपत्र सोबत जोडण्यांत यावे. याव्यतिरीक्त अन्य शासन निर्णयातील तरतुदीनुसार अनामत रक्कम भरण्यापासून सूट मिळण्याची अट या निविदेस लागू होत नसल्याने त्याअंतर्गत मोडणा-या संस्थाना अनामत रक्कम भरणे अनिवार्य असेल. |
| ३ | आयकर अधिनियमाप्रमाणे दरमहा अदा होणाऱ्या देयकामधून नियमानुसार आयकर वजा करण्यात येईल. यासाठी पॅनकार्डची छायांकित प्रत जोडण्यात यावी. |
| ४ | वस्तु व सेवाकर कायदा, २०१७ नुसार नोंदणीकृत असल्याचे प्रमाणपत्र व क्रमांक जोडण्यात यावे. |
| ५ | कंत्राटी कर्मचा-याच्या वेतनातून भविष्य निर्वाह निधी / राज्य कामगार विमा योजना (EPF/SEIS) अंतर्गत वर्गणी वजा करण्यात येत असल्याचे प्रमाणपत्र (चलनाच्या प्रतीसह) जोडणे आवश्यक राहील. |
| ६ | मागील ३ वर्षाच्या कालावधीत किमान ५ शासकीय/निमशासकीय कार्यालयांना कंत्राटी तत्त्वावर शिपाई पुरवठा केल्याबाबत व त्यांचे काम समाधानकारक असल्याचे संबंधित कार्यालयाचे प्रमाणपत्र जोडण्यात यावे |
| ७ | संस्थेची वार्षिक उलाढाल ही मागील तीन वर्षासाठी सरासरी पंचवीस लाखापेक्षा कमी नसावी. तसेच सनदी लेखापालांकडून प्रमाणित करण्यात आलेल्या मागील तीन वर्षाच्या ताळेबंदाच्या प्रती निविदा अर्जासोबत जोडण्यात याव्यात |
| ८ | मागील आर्थिक वर्षात (सन २०२४-२५ मध्ये) GST भरल्याबाबतची वस्तु व सेवाकर विभागाकडील चलनाची प्रत जोडण्यात यावी |
| ९ | मागील आर्थिक वर्षात (सन २०२४-२५ मध्ये) व्यवसाय कर भरल्याबाबतची वस्तु व सेवाकर विभागाकडील चलनाची प्रत जोडण्यात यावी |
| १० | संस्थेचे नांव काळ्या यादीत समाविष्ट नसल्याबाबतचे, संस्थेविरोधात पोलिस चौकशी / तपास /न्यायालयीन प्रकरणे चालू नसल्याचे हमीपत्र संस्थेच्या चालकांचे सहीनिशी जोडण्यात यावे. |
| ११ | मागील ३ वर्षाचे IT return भरल्याची प्रत जोडावी |

| | |
|---|---|
| | ब. व्यापारी लिफाफा |
| १ | १ वाहनचालक व ७ शिपाई पदांसाठी किमान वेतन अधिनियम १९४८ कायद्यानुसार दुकाने व व्यापारी आस्थापना उद्योग ह्या प्रकारातील कुशल/अकुशल कामगाराकरिता देय वेतन देणे बंधनकारक राहील. |
| २ | उद्योग ऊर्जा कामगार विभागाच्या सुधारीत अधिसूचना दि.२४/०७/२०१९ नुसार व किमान वेतन अधिनियमातील तरतूदीनुसार द्यावयाच्या मासिक पारिश्रमिक रक्कम दिलेल्या विहित नमुन्यात सादर करावी. याबाबतचा सविस्तर तपशिल कंत्राट मान्य झाल्यानंतर कंत्राटदाराकडून या कार्यालयास सादर करावा, |
| ३ | कंत्राटदाराने / पुरवठादाराने / निविदाकाराने वरील किमान वेतनानुसार मासिक पारिश्रमिक दर अदा करावे |

Scanned with OKEN Scanner

| | |
|---|---|
| ४ | कंत्राटदार / पुरवठादाराचे मान्य दर हे कार्यारंभ आदेश दिल्याच्या तारखेपासून ११ महिन्यांसाठी लागू राहतील. दर कराराच्या कालावधीत कोणतीही दरवाढ मंजूर केली जाणार नाही. |

| | |
|---|---|
| इ. | दरपत्रके /निविदा छाननीबाबत |
| १ | कंत्राटदाराने / पुरवठादाराने नमूद केलेले दर हे दरपत्रके उघडण्याच्या तारखेपासून १० दिवसांच्या कालावधीपर्यंत वैध / विधीग्राहय असतील. |
| २ | किमान ०३ दरपत्रके प्राप्त झाल्यास तांत्रिक लिफाफा उघडण्यात येतील. दरपत्रके शक्य झाल्यास विहित केलेल्या दिनांकास उघडण्यात येतील. तांत्रिक लिफाफ्यामध्ये पात्र ठरलेल्या पुरवठादाराचेच वाणिज्य लिफाफे उघडण्यात येतील. |
| ३ | तांत्रिक दरपत्रक उघडल्यानंतर वाणिज्य दरासंबंधीचे लिफाफे उघडण्यास काही अडचणी आल्यास दरपत्रकाचा लिफाफा उघडला जाणार नाही, सहभागी किमान ३ दरपत्रकारांपैकी किमान २ वैध दरपत्रके असतील तरच दराचा लिफाफा उघडण्यात येईल. त्यातून पात्र ठरलेल्या कंत्राटदाराचे / पुरवठादाराचे न्युनतम किमतीचे दर स्विकृत करण्यात येतीलं. शासनाने वेळोवेळी ठरवून दिलेले कर तुलना करताना विचारात घेण्यात येतील. त्यानंतर न्युनत्तम ठरलेल्या दरपत्रकाच्या आधारे दर स्विकृत करण्यात येतील. |
| ४ | प्राप्त झालेले दर हे बाजारातील प्रचलित दरापेक्षा अवास्तव वा जास्त असणार नाहीत. |
| ५ | शासनाने ठरवून दिलेल्या कार्यपध्दतीनुसार दरपत्रके/निविदा छाननी बाबतचा अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार कंत्राट मूल्याप्रमाणे संबंधित समितीकडे किंवा वित्तीय सल्लागार व उपसचिव, मुंबई यांचेकडे राखुन ठेवण्यांत येतील. सदर निर्णय कंत्राटदारावर / पुरवठादारावर यांना मान्य करणे बंधनकारक राहील. |

| | |
|---|---|
| ई. | पात्र निविदाकाराने / पुरवठादाराने करावयाच्या कार्यवाहीबाबत |
| १ | उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रः भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४. दि.०१/१२/२०१६ मधील प्रकरण क्र.४ अ.क्र.४.६ (अ) मधील तरतुदीनुसार निविदा मान्य झालेल्या कंत्राटदारास/पुरवठादारास निकाल कळविल्यानंतर १५ दिवसाच्या आत आदेशाच्या मूल्याच्या कमीत कमी तीन (३) टक्के एवढी सुरक्षा ठेव अनामत (Secutity Deposit) देय आहे. त्यानुसार दोन महिन्याच्या मानधनाची रक्कम रु.३,४०,०००/- इतक्या रक्कमेचा राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (डीमांड ड्राफ्ट) लेखा अधिकारी, वित्तीय सल्लागार व उपसचिव, मुंबई यांचे नावे द्यावा लागेल. विहित मुदतीत सुरक्षा ठेव अनामत जमा न केल्यास विहीत नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल. |
| २ | पात्र कंत्राटदाराने / पुरवठादाराने कामाचे आदेश देण्यापूर्वी रुपये ५००/- चे मुद्रांक पेपर वर करारनामा करून नियमानुसार देय मुद्रांक शुल्काचा भरणा करणे आवश्यक राहील. |
| ३ | करारनामा केल्यानंतर कंत्राटदाराने दिलेल्या विहित मुदतीत आवश्यकतेप्रमाणे मनुष्यबळ पुरवठा न केल्यास विहित नियमानुसार विलंब आकार / दंड आकारला जाईल. सदर दंडाची वसुली प्रशासकीय सेवा आकार किंवा सुरक्षा ठेव अनामत रकमेतून करण्यात येईल. |
| ४ | कंत्राटदाराकडून / पुरवठादाराकडून करारनाम्यातील कोणत्याही अटीचे उल्लंघन झाल्यास कामाचे आदेश रद्द करण्यात येतील व त्याला कोणतीही रक्कम प्रदेय राहणार नाही. जमा केलेली सुरक्षा ठेव अनामत रक्कम जप्त केली जाईल. |
| ५ | करारनाम्याच्या कालावधीत कोणतीही तक्रार प्राप्त न झाल्यास, करारनाम्याचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर अथवा करारनामा संपुष्टात आल्यानंतर पुढील ३ महिन्याच्या कालावधीत अनामत रक्कम मुक्त करण्यात येईल. |
| ६ | वित्तीय सल्लागार व उपसचिव, मुंबई यांना कोणत्याही वेळी कोणतेही कारण न दर्शविता पुरवठादारास १ महिन्याची आगाऊ नोटीस देवून करारनामा रद्द करण्याचा / संपुष्टात आणण्याचा अधिकार असेल. |

Scanned with OKEN Scanner

| फ | मासिक पारिश्रमिक अदा करण्याबाबतची कार्यपध्दती |
|---|---|
| १ | मनुष्यबळ पुरवठा केल्यानंतर वित्तीय सल्लागार व उपसचिव, मुंबई यांचेकडून रुजू झाल्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यांत येईल. तसेच लेखा अधिकारी (आस्थापना), वित्तीय सल्लागार व उपसचिव, मुंबई हे संबंधित उमेदवाराची बायोमेट्रीक मशीनमध्ये तसेच हजेरीपटावर नोंद घेतील. |
| २ | लेखा अधिकारी (आस्थापना) यांनी प्रत्येक महिन्याच्या कार्यालयीन कामकाजाच्या शेवटच्या दिवशी वित्तीय सल्लागार व उपसचिव, मुंबई येथील कंत्राटी कर्मचा-यांचे उपस्थिती प्रमाणपत्र कंत्राटदार / पुरवठादार यांचेकडे पाठविणे आवश्यक राहील. |
| ३ | लेखा अधिकारी (आस्थापना) यांनी कार्यालयातील कंत्राटी शिपाई यांच्या कामकाजावर नियंत्रण ठेवणे. |
| ४ | लेखा अधिकारी (आस्थापना) यांचे नियंत्रणाखाली असलेल्या कंत्राटी शिपायांचे मासिक पारिश्रमिक देयक कंत्राटदाराने / पुरवठादाराने उपस्थिती प्रमाणपत्राच्या प्रतीसह कार्यालयात महिन्याच्या ०५ तारखेपर्यंत सादर करावे. देयक पारित झाल्यानंतर संबंधित कंत्राटदार/पुरवठादार यांना ई प्रदान (NEFT/ECS/RTGS) संबंधित कार्यालयामार्फत करण्यात येईल. |
| ५ | कंत्राटदारास / पुरवठादारास बाह्ययंत्रणेमार्फत पुरविण्यात येणा-या कंत्राटी कर्मचाऱ्यास मासिक पारिश्रमिक त्यांच्या बँक खात्यामध्ये अदा केल्याचा पुरावा संबंधित संस्थेस लेखा अधिकारी (आस्थापना) यांना प्रत्येक महिन्यात सादर करावा लागेल, त्यानंतरच पुढील महिन्याचे वेतन संस्थेस अदा करण्यात येईल. |
| ६ | कंत्राटी कर्मचा-यांचे मासिक पारिश्रमिक हे कंत्राटदाराने /पुरवठादाराने प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत संबंधित कर्मचा-यांच्या बँक खात्यावर रेखांकित धनादेशाद्वारे (Account Payee Cross Cheque)/NEFT/ECS/RTGS व्दारे जमा करणे आवश्यक राहील |
| ७ | कंत्राटदाराने / पुरवठादाराने कंत्राटी कर्मचाऱ्यास दिलेल्या पारिश्रमिकाच्या / इतर भत्त्यांच्या प्रदानाबाबतची छायांकीत प्रत दरमहा सादर केल्याशिवाय कंत्राटदाराला / पुरवठादाराला पुढील महिन्याचे देयक अदा केले जाणार नाही. |
| ८ | कंत्राटदाराने / पुरवठादाराने कंत्राटी उमेदवारास मासिक वेतनचिठ्ठी देणे आवश्यक राहील. |
| ९ | कंत्राटदाराने / पुरवठादाराने कंत्राटी कर्मचा-यास किमान वेतन कायद्यातील तरतूदीपेक्षा कमी वेतन दिल्यास अथवा दायित्वाची रक्कम ठरलेल्या दराप्रमाणे कपात करून संबंधित प्राधिकरणाकडे जमा न केल्यास अथवा संबंधित उमेदवाराकडुन ज्यादा रक्कम घेतल्याबाबतची तक्रार प्राप्त झाल्यास व तसे पुरावे आढळल्यास संबंधित कंत्राटदार / पुरवठादार किमान वेतन कायद्यातील तरतूदीप्रमाणे कारवाईस पात्र असेल. |
| १० | कंत्राटदारास / पुरवठादारास रक्कम अदा करताना आयकर व वस्तु व सेवाकर (GST) कायद्यातील तरतूदीनुसार आयकराची/ वस्तु व सेवाकरची रक्कम कपात करुन उर्वरित रक्कम अदा केली जाईल. वस्तू व सेवा कर (GST) २०१७ व महाराष्ट्र वस्तू व सेवा कर कायदयाअंतर्गत अधिसूचना क्र.५०/२०१८ मधील तरतूदीनुसार वस्तू व सेवा विषयक एका संविदाखालील मूल्य रु.२,५०,०००/- पेक्षा अधिक असेल अशा करपात्र वस्तू किंवा सेवा यांच्या पुरवठ्यासाठी प्रदान करण्यांत येणा-या रकमेतून विहीत दरानुसार कपात करण्याची जबाबदारी ही लेखा अधिकारी, वित्तीय सल्लागार व उपसचिव, मुंबई यांची राहील. तसेच याबाबत शासनाकडून वेळोवेळी लागु करण्यांत आलेल्या नियमांप्रमाणे कार्यवाही करणे बंधनकारक राहील. |
| ११ | व्यवसाय कर भरण्याची जबाबदारी संबंधित कंत्राटदार/पुरवठादार यांची राहील. |
| १२ | उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०१९/प्र.क्र.१३/कामगार-८. दि.२२/०२/२०१९ अन्वये कंत्राटदारामार्फत पुरविलेल्या मनुष्यबळापोटी कंत्राटदारास अदा करावयाच्या देयकांची कार्यपध्दती विहीत करण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयातील जोडपत्र-अ मधील तरतुदी कंत्राटदारास/ पुरवठादारास / निविदाकारास बंधनकारक राहतील. (प्रत संलग्न) |
| १३ | लेखा अधिकारी, वित्तीय सल्लागार व उपसचिव, मुंबई यांचेमार्फत कंत्राटदारास मासिक पारिश्रमिकाची अदायगी होणार असल्यामुळे दायित्व नियमातील तरतूदीनुसार जमा केले जात असल्याबाबतची |

Scanned with OKEN Scanner

| | |
|---|---|
| | खातरजमा त्यांचे स्तरावरुन करणे आवश्यक राहील. करारनामा समाप्त झाल्यानंतर कंत्राटदारास सुरक्षा ठेव अनामत अदा करण्याबाबतचे ना हरकत प्रमाणपत्र आस्थापना शाखेकडे सादर केल्यानंतर अनामत रक्कम अदा करण्याबाबतचे आदेश आस्थापना शाखेकडुन निर्गमित करण्यांत येतील, |

| ग | बाह्ययंत्रणेमार्फत मनुष्यबळ (शिपाई) पुरविणाऱ्या संस्थांसाठी अटी व शर्ती |
|---|---|
| १ | कंत्राटी कर्मचारी उमेदवाराची कंत्राटी सेवा चालू ठेवण्याचे/संपुष्टात आणण्याचे सर्व अधिकार वित्तीय सल्लागार व उपसचिव, मुंबई यांचे स्वाधीन राहतील |
| २ | कंत्राटी कर्मचारी वेळेवर कार्यालयात उपस्थित न झाल्यास किंवा विनापरवानगी गैरहजर राहिल्यास त्याचे त्या दिवसाचे वेतन अदा करण्यात येणार नाही. |
| ३ | कंत्राटी कर्मचारी दिर्घकाळ (७ दिवसांपेक्षा जास्त) रजेवर असल्यास पर्यायी शिपाई पुरविणे बंधनकारक राहील. |
| ४ | कंत्राटी कर्मचा-यांस सचोटी/चारित्र्याबाबतचे पोलीस खात्याचे प्रमाणपत्र हजर झाल्यावर सादर करावे लागेल. |
| ५ | नियुक्त केलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना गणवेश कंत्राटदारानेच पुरविणे अनिवार्य राहील. |
| ६ | कंत्राटी शिपाई कर्मचारी हे गणवेशातच तसेच त्यांच्या संस्थेच्या ओळखपत्रासहीत कार्यालयात उपस्थित राहतील याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराने घ्यावी. |
| ७ | कर्मचाऱ्यांच्या कामाच्या वेळा कार्यालयाच्या गरजेनुसार ठरविण्यात येतील. त्यानुसार कंत्राटदाराने सर्व कंत्राटी कर्मचारी कार्यालयात पूर्णवेळ सकाळी ०९.१५ ते संध्याकाळी ०६.३० या वेळेत हजर राहतील ही जबाबदारी कंत्राटदाराची राहील. |
| ८ | कायम स्वरुपी शासकीय नोकरीसाठी कार्यालयाकडे / शासनाकडे / न्यायालयाकडे दावा अथवा खटला करणार नाही, अशा आशयाचे हमीपत्र सेवेत हजर होताना सादर करणे बंधनकारक. |
| ९ | कोणतीही निविदा/ई निविदा स्विकारण्याचा किंवा एखादी/सर्व निविदा/ई-निविदा कारण न देता नाकारण्याचा हक्क वित्तीय सल्लागार व उपसचिव, मुंबई यांना राहील. |

उपरोक्त नमूद अटी व शर्तीची पूर्तता करणाऱ्या बाह्ययंत्रणेच्या संस्थाकडून वित्तीय सल्लागार व उपसचिव, मुंबई येथे ०१ वाहनचालक व ०७ शिपाई असे एकूण ८ कर्मचा-यांची सेवा ११ महिन्यांकरीता (दिनांक ०१/०४/२०२६ पासून) उपलब्ध करुन घेण्यासाठी निविदा **मागविण्यात येत आहे**.

**निवीदा अर्ज दिनांक १४ फेब्रुवारी, २०२६ पासून विभागाच्या संकेतस्थळावरील (mahafood.gov.in) निविदा पोर्टलवर तसेच GeM प्रणालीवर उपलब्ध राहील.**

ठिकाण : मुंबई

दिनांक : १२ फेब्रुवारी, २०२६

(सारिका ननवरे)
उपसंचालक
वित्तीय सल्लागार व उपसचिव यांचे कार्यालय,
मुंबई

Scanned with OKEN Scanner

निवीदेचा कालावधी

| अ.क्र. | तपशील | दिनांक व वेळ |
|---|---|---|
| १ | जाहिरातीचा दिनांक | १३ फेब्रुवारी, २०२६ |
| २ | निवीदा ऑनलाईन भरण्याचा दिनांक | १४ फेब्रुवारी, २०२६ सकाळी १० वाजेपासून |
| ३ | निवीदा ऑनलाईन भरण्याचा शेवटचा दिनांक | २८ फेब्रुवारी, २०२६ संध्याकाळी ४ वाजेपर्यंत |
| ४ | बोलीपूर्व बैठकीचा दिनांक | २० फेब्रुवारी, २०२६ सकाळी ११ वाजता |
| ५ | तांत्रिक लिफाका उघडण्याचा दिनांक व वेळ | २ मार्च, २०२६ सकाळी ११ वाजता |
| ६ | व्यापारी लिफाका उघडण्याचा दिनांक व वेळ | २ मार्च, २०२६ दुपारी १२ वाजता |
| ७ | निवीदा सादर करण्यासाठी संपर्काचा पत्ता | वित्तीय सल्लागार व उपसचिव,<br>८ वा मजला, गोकुलदास तेजपाल संकुल इमारत, लोकमान्य टिळक मार्ग,<br>मुंबई – ४०० ००१ |
| ८ | ई-मेल आयडी | fadsmumbai.mhpds@gov.in |

Scanned with OKEN Scanner

## काळया यादीत न टाकल्याबाबत/बंदी न घातल्याबाबत प्रमाणपत्र

मी / आम्ही श्री. व श्री मालक / संचालक (संस्थेचे नाव) शपथपूर्वक घोषित करतो की उक्त नमूद संस्था वर्षापासून मनुष्यबळ पुरविण्याचे काम करत आहे. त्यानुसार मी/आम्ही असे स्वप्रमाणित करतो की, निविदा भरणेचे दिनांकास म्हणजेच दिनांक रोजी शिपाईचे काम समाधानकाररित्या पार न पडल्यामुळे कोणत्याही केंद्र शासकीय, राज्य शासकीय अथवा निमशासकीय कार्यालयाने मेसर्स (संस्थेचे नाव) या संस्थेस काळया यादीत टाकण्यात आलेले नाही, तसेच या संस्थेविरुद्ध शिपाईच्या कामाच्या अनुषंगाने भारतामधील कोणत्याही न्यायालयात कोणताही दावा / खटला प्रलंबित नाही तसेच आमचेविरुद्ध कोणत्याही पोलीस स्थानकात गुन्हा दाखल नाही.

उपरोक्त प्रमाणे करण्यात आलेले निवेदन हे संपूर्णपणे सत्य आहे.

स्वाक्षरी

संपूर्ण नाव :-

संस्थेचा / कंपनीचा रबरी शिक्का पत्यासंहित

दिनांक :

ठिकाण :-

Scanned with OKEN Scanner

व्यापारी लिफाफा

| अ.क्र. | बाब | | | अकुशल कामगारासाठी (शिपाई) दर (प्रतिमाह) रुपया मध्ये |
|---|---|---|---|---|
| १ | मुळ वेतन Basic Pay | | | १०,०२१ |
| २ | विशेष भता (Special Allowance) | | | ३,६१४ |
| ३ | एकूण किमान वेतन | | A | १३,६३५ |
| i | (+) घरभाडे भता @ ५% एकुण किमान वेतनावर | ५% | | ६८२ |
| ii | (+) बोनस उपदान @ ८.३३% एकूण किमान वेतनावर | ८.३३% | | १,१३६ |
| iii | (+) रजा उपदान @ ७.३७% एकूण किमान वेतनावर | ७.३७% | | १,००५ |
| ४ | एकूण किमान वेतन व भत्ते | | B | १६,४५८ |
| ५ | कर्मचाऱ्याच्या किमान वेतनातून वजा करावयाच्या कायदेशीर दायित्वाच्या बाबी | | | |
| i | भविष्य निर्वाह निधी @१३% एकुण किमान वेतनावर | १३% | | १,७७३ |
| ii | प्रशासकीय दर भ.नि.नि. करीता @१.१५% एकूण किमान वेतनावर | १.१५% | | १५७ |
| iii | राज्य कामगार विमा योजना @३.२५% एकूण किमान वेतन व भत्तेवर | ३.२५% | | ५३५ |
| iv | कामगार कल्याण निधी | | | १२ |
| | कायदेशीर दायित्त्वाच्या एकूण वजाती | | C | २,४७७ |
| ६ | एकूण किमान वेतन व भत्ते व किमान वेतनातून वजा करावयाच्या कायदेशीर दायित्वाच्या बाबी | | D (B+C) | १८,९३५ |
| ७ | सेवा आकार - कंत्राटदाराने नमूद करणे | | E | |
| ८ | कंत्राटदारास अदा करावयाचे एकूण किमान वेतन व भत्ते | | F (D+E) | |
| ९ | सेवा कर (service tax) अ.क्र. ८ वर येणाऱ्या रकमेवर सेवा कराची आकारणी | | G | |
| १० | कंत्राटाची एकूण किंमत सेवा कर धरून | | H (F+G) | |
| ११ | देय मासिक पारिश्रमिक खालीलप्रमाणे | | | |
| १२ | मासिक पारीश्रानिकामधून वजा होणाऱ्या कायदेशीर दायित्वाच्या बाबी | | | |
| i | (-) भविष्य निर्वाह निधी @१२% एकूण किमान वेतनावर | १२% | | १,६३६ |
| ii | [-] राज्य कामगार विमा योजना @०.७५% | ०.७५% | | १०२ |
| iii | व्यवसाय कर | | | २०० |
| १३ | कायदेशीर दायित्वाच्या एकूण वजाती | | I | १,९३८ |
| १४ | कंत्राटी कर्मचाऱ्यास अदा करावयाची रक्कम | | J(B-I) | १४,५२० |

निविदाकाराची सही
रबर स्टँपसह

Scanned with OKEN Scanner

व्यापारी लिफाफा

| अ.क्र. | बाब | | | कुशल कामगारासाठी (वाहनचालक) दर (प्रतिमाह) रुपया मध्ये |
|---|---|---|---|---|
| १ | मुळ वेतन Basic Pay | | | ११,६३२ |
| २ | विशेष भता (Special Allowance) | | | ३,६१४ |
| ३ | एकूण किमान वेतन | | A | १५,२४६ |
| i | (+) घरभाडे भता @ ५% एकूण किमान वेतनावर | ५% | | ७६२ |
| ii | (+) बोनस उपदान @ ८.३३% एकूण किमान वेतनावर | ८.३३% | | १,२७० |
| iii | (+) रजा उपदान @ ७.३७% एकूण किमान वेतनावर | ७.३७% | | १,१२४ |
| ४ | एकूण किमान वेतन व भत्ते | | B | १८,४०२ |
| ५ | कर्मचाऱ्याच्या किमान वेतनातून वजा करावयाच्या कायदेशीर दायित्वाच्या बाबी | | | |
| i | भविष्य निर्वाह निधी @१३% एकूण किमान वेतनावर | १३% | | १,९८२ |
| ii | प्रशासकीय दर भ.नि.नि. करीता @१.१५% एकूण किमान वेतनावर | १.१५% | | १७५ |
| iii | राज्य कामगार विमा योजना @३.२५% एकूण किमान वेतन व भत्तेवर | ३.२५% | | ५९८ |
| iv | कामगार कल्याण निधी | | | १२ |
| | कायदेशीर दायित्त्वाच्या एकूण वजाती | | C | २,७६७ |
| ६ | एकूण किमान वेतन व भत्ते व किमान वेतनातून वजा करावयाच्या कायदेशीर दायित्वाच्या बाबी | | D (B+C) | २१,१६९ |
| ७ | सेवा आकार - कंत्राटदाराने नमूद करणे | | E | |
| ८ | कंत्राटदारास अदा करावयाचे एकूण किमान वेतन व भत्ते | | F (D+E) | |
| ९ | सेवा कर (service tax) अ.क्र. ८ वर येणाऱ्या रकमेवर सेवा कराची आकारणी | | G | |
| १० | कंत्राटाची एकूण किंमत सेवा कर धरून | | H (F+G) | |
| ११ | देय मासिक पारिश्रमिक खालीलप्रमाणे | | | |
| १२ | मासिक पारीश्रानिकामधून वजा होणाऱ्या कायदेशीर दायित्वाच्या बाबी | | | |
| i | (-) भविष्य निर्वाह निधी @१२% एकूण किमान वेतनावर | १२% | | १,८३० |
| ii | [-] राज्य कामगार विमा योजना @०.७५% | 0.७५% | | १३८ |
| iii | व्यवसाय कर | | | २०० |
| १३ | कायदेशीर दायित्वाच्या एकूण वजाती | | I | २,१६८ |
| १४ | कंत्राटी कर्मचाऱ्यास अदा करावयाची रक्कम | | J(B-I) | १६,२३४ |

निविदाकाराची सही
रबर स्टँपसह

Scanned with OKEN Scanner

## तांत्रिक लिफाफा

| | | |
|---|---|---|
| १ | कंत्राटदाराचे संस्थेचे / कंपनीचे नाव व पूर्ण पत्ता | |
| | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण परिक्षेत्रातील कार्यालयाचा तपशिलवार पत्ता | |
| २ | संस्था/कंपनी/फर्म असल्यास | |
| | नोंदणीचा तपशिल | |
| | ब) कंत्राटदाराचा/संस्थेचा/कंपनीचा संपूर्ण पत्ता | |
| ३ | संपर्काचा तपशील | |
| | अ) दूरध्वनी क्रमांक | |
| | ब) भ्रमणध्वनी | |
| | क) ई-मेल आयडी | |
| ४ | दुकान परवाना क्रमांक / प्रमाणपत्र (नुतनीकरणासह) | |
| ५ | EPF रजिस्ट्रेशन क्रमांक | |
| ६ | ESIC रजिस्ट्रेशन क्रमांक | |
| ७ | वस्तु व सेवा कर नोंदणी क्रमांक | |
| ८ | व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपत्र | |
| ९ | संस्थेचे / कंपनीचे / मालकाचे आयकर Pan Card क्रमांक (प्रत) | |
| १० | कंत्राटी कर्मचा-याच्या वेतनातून भविष्य निर्वाह निधी / राज्य कामगार विमा योजना (EPF/SEIS) अंतर्गत वर्गणी वजा करण्यात येत असल्याचे प्रमाणपत्र | |
| ११ | नजीकच्या कालावधीमध्ये GST भरल्याबाबतची संबंधित विभागाकडील चलनाची प्रत | |
| १२ | नजीकच्या कालावधीमध्ये व्यवसाय कर भरल्याबाबतची संबंधित विभागाकडील चलनाची प्रत | |
| १३ | सनदी लेखापालांकडून प्रमाणित करण्यात आलेल्या मागील तीन वर्षाच्या ताळेबंदाच्या प्रती | |
| १४ | मागील ३ वर्षाच्या कालावधीत किमान ५ शासकीय/निमशासकीय कार्यालयांना कंत्राटी तत्वावर शिपाई पदाचा पुरवठा केल्याबाबत अनुभव प्रमाणपत्र | |
| १५ | मागील तीन वर्षाचे IT return भरलेची प्रत | |

१. निविदा मंजूर करण्याचे सर्व अधिकार खरेदी समितीकडे राखीव आहेत हे मला मान्य आहे.

२. या निविदेतील अटी व शर्ती मला संपूर्णपणे मान्य आहेत. तसेच अटी व शर्तीबाबत माझी कोणतीही तक्रार नाही.

३. निविदे समवेतच्या करारनाम्यातील सर्व बाबी मला विनाशर्त मान्य आहेत.

४. प्रमाणपत्रे सोबत जोडली आहेत.

निविदाकाराची सही
रबर स्टँपसह

Scanned with OKEN Scanner